# कुंती !

कुंती कोठेच्या वशीकरण प्रयोगातून मी शिताफीनं निसटलो असं त्यावेळी मला वाटलं होतं.... मी सुरू केलेल्या महान तपस्येचा भंग करावयास आलेली ती एक मायाविनी आहे असं मी समजलो होतो..... तिचा अनुभव मला माझी दिशाभूल करणाऱ्या चकव्यासारखा वाटला होता. माझ्या प्रगतीच्या मार्गात आडवी आलेली मखमली दलदल मी तिला समजलो होतो, जशी फसवी दलदल की, जिच्यावर पाय पडला असता तर मी पूर्णपणे गाडलो गेलो असतो, नामशेष झालो असतो.....

अन् असं समजायला कारण होतं !

कारण त्यावेळी मी नाट्यक्षेत्रात दिग्दर्शक म्हणून नुकतच पाऊल टाकलं होतं. एक हौशी दिग्दर्शक म्हणून माझं नाव मोजक्या जाणकारांच्या मुखात कौतुकानं येऊ लागलं होतं. सरकारी नाट्यस्पर्धेत क्रमाक्रमानं वरचे क्रमांक पटकावत त्या वर्षी तर दिग्दर्शक म्हणून मी साऱ्या महाराष्ट्रातून प्रथम आलो होतो. मी बसविलेल्या नाटकालाही पहिलं बक्षिस मिळालं होतं.....

इतर अनेक छोटीमोठी बक्षिसं ह्याच नाटकाला मिळाली होती. मी स्वत: जातीनं ही सारी बक्षिसं स्वीकारावी असं आमच्या मंडळानं ठरवलं. त्यानुसार मी मुंबईला बक्षिससमारंभाला हजर राहण्यासाठी आणि फुरसतीनं मुंबई पाहण्यासाठी मोठी रजा घेऊन आलो.....

आणि त्या समारंभातच माझी कुंतीशी प्रथम गाठ पडली !

अभिनयाचं पहिलं पारितोषिक स्वीकारण्यासाठी ती जेव्हा स्टेजवर आली तेव्हा तिच्या लावण्यानं माझे डोळे दिपून गेले.

डौलदार बांधा, लांबसडक काळे कुरळे केस, गौरवर्ण, उंच कपाळावर रुळणारी एक अल्लड बट, टप्पोरे काळेशार डोळे, कपाळातून उचललेली सरळ नासिका नि नाजुक जिवणी !......

पण ह्या सर्वांआधी माझ्या सराईत नजरेत ठसला तो तिचा अत्यंत भावदर्शी, मोहक चेहरा !

तिला अभिनयाचं प्रथम पारितोषिक मिळालं यात काहीच नवल नव्हतं. उलट तिच्या उत्कृष्ट मध्यवर्ती भूमिकेमुळेच त्यांच्या ग्रुपच्या नाटकाला दुसऱ्या क्रमांकाचं बक्षिस मिळालं अशी बोलवा होती, आणि तीत तथ्य दिसत होते.

तिची ओळख व्हावी असं मला वाटू लागलं. तिचंही माझ्यावर लक्ष होतंच असं मला दिसून आलं. कारण मी बक्षिस स्वीकारण्यासाठी जेव्हा जेव्हा स्टेजवर गेलो तेव्हा तेव्हा बक्षिस स्वीकारून प्रेक्षकांना अभिवादन करताना चोरून तिच्याकडे बघत होतो अन् दरवेळी ती कौतुकमिश्रित आदरानं आपल्याचकडे पाहात असताना आणि नजरानजर होताच मोहक हसून पावती देताना मला सापडली होती. अन् म्हणूनच तिची ओळख करून घेण्याची इच्छा अधिकच प्रबळ होऊ लागली .......

शेवटी समारंभ आटोपल्यावर चहापानाच्या वेळी माझी तिच्याशी ओळख करून देण्यात आली.

तिचं नाव 'कुंती कोठे' आहे हे मला आधी कळलं होतचं. पण ती विवाहित आहे आणि डोक्याला समोरून अर्ध टक्कल पडलेले, डोळ्यांना सोनेरी फ्रेमचा चष्मा लावलेले, कडक कॉलर, टाय आणि सुटाबुटात असलेले आणि उत्साहानी उतू जात असलेल्या चेहऱ्यानं तिच्या अवतीभोवती वावरणारे, पोट सुटलेले वयस्क गृहस्थ म्हणजे तिचे पति आहेत अन् ते महाराष्ट्र सरकारच्या कोणत्याशा खात्यात क्लास वन् ऑफिसर आहेत हे मात्र मला चहापाण्याच्या वेळी कळलं.

बायकोच्या कलागुणांनी ते इतके भारावून गेलेले दिसले की कुंतीनं जेव्हा आपल्या मंडळातील कलावंतांशी व नंतर त्यांच्याशी माझी ओळख करून दिली तेव्हा त्यांनी जोरानं माझ्याशी हस्तांदोलन केलं. आपल्या मोटारीतून बंगल्यावर नेलं. खाना दिला. मुंबईस असेपर्यंत आपल्याच बंगल्यावर ठेवून घेतलं. मी प्रथमच मुंबईला फुरसतीनं आलेलो आहे हे समजल्यावर मला मुंबई पाहण्याचा जबरदस्त आग्रह केला. माझ्या दिमतीला कुंतीलाच ठेवलं. आपली गाडी दिली.

स्वत:च्या बायकोचं इतकं कौतुक करणारा नवरा मी प्रथमच पाहात होतो. एक अपत्यसुख सोडून सारी सुखं तिच्यासमोर हात जोडून उभी होती. कुंती खरोखरच भाग्यवान होती !

त्यांच्या बंगल्यावर, कुंतीच्या सहवासात, मुंबईत निरनिराळ्या प्रेक्षणीय स्थळांना भेटी देण्यात, सिनेमानाटकं बघण्यात, अद्ययावत क्लबमध्ये धुंदफुंद जीवनाचा उपभोग घेण्यात आणि आपल्या आवडत्या क्षेत्रात चालू झालेल्या निरनिराळ्या प्रवाहांबद्दल, प्रयोगांबद्दल, अभिनय, तंत्र, कलामूल्य इत्यादिबद्दल कुंतीशी मनमुराद गप्पा मारण्यात घालविलेले ते सोनेरी दिवस नागपूरला

परतल्यावरही कित्येक दिवस मला आठवत राहिले. प्रमुदित करीत राहिले. त्या आठवणी म्हणजे माझा एक अमोल ठेवा झाला. असा ठेवा की जो उघडताच एकप्रकारची अलौकिक, तरल धुंदी मला चढायची. माझ्याभोवती अल्हाददायक, मधुर, सुगंधी वातारवरण तयार व्हायचं. माझं मन एका वेगळ्याच प्रसन्न विश्वात विहरू लागायचं.

नागपूरला परतून वर्ष होत आलं तरी मी कुंतीला अन् तिच्या रोमहर्षक सहवासाला म्हणूनच विसरू शकलो नव्हतो. उलट अशा आठवणीनंतर मी बराच वेळ आत्मपरिक्षण करायचो.... कुंतीच्या लावण्याचं मला सुप्त आकर्षण वाटतं का ?.... की केवळ समानधर्मी लोकांना मिळणारा सात्त्विक आनंद मी भोगतो आहे ?.... की अजून काही ?....

प्रश्नाचं उत्तर मला कधीच मिळालं नाही. खरं म्हणजे तसा निकराचा प्रयत्नही मी कधी केला नाही, गरजही नव्हती.

कारण एकदोन जुजबी पत्रांची देवाणघेवाण आमच्यात नंतर झाली आणि मग आम्ही आपापल्या जगात वापस आलो. वावरू लागलो. मी प्रथम आलेल्या आमच्या नाटकाचे विदर्भात प्रयोग करू लागलो. मंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी झटू लागतो. गढून गेलो.

एका शनिवारी घरी, असाच वर्तमानपत्र चाळत सकाळी मी बसलो होतो आणि एवढ्यात माझं लक्ष एका जाहिरातीनं वेधून घेतलं. कुंती कोठेच्या त्या दुसऱ्या आलेल्या नाटकाचा आज रात्री धनवटे रंगमंदिरात प्रयोग होणार होता ! विदर्भाच्या दौऱ्यावर तिचं मंडळ निघालं होतं !!

माझ्या लगेच लक्षात आलं की हे नाटक आपण पाहिलंच नाही. त्या बक्षिस समारंभानंतर पंधरावीस दिवस मुंबईला ह्या नाटकाचा प्रयोगच झाला नाही अन् म्हणून ते पाहायचं राहून गेलं होतं.

आता मात्र हे नाटक सोडायचं नाही असं मी मनात ठरवत असतानाच कॉलबेल वाजली म्हणून मी उठून दार उघडलं अन् कुंतीला दारात पाहून माझ्या तोंडून एक आश्चर्योद्‌गार निघून गेला. तेव्हा गालात हसत मान वेळावत ती म्हणाली, --

"अगदी अनपेक्षित आले, नाही ?"

"अगदी तसंच नाही. पण आता तुझीच आठवण काढीत होतो, एवढ्यात तू दारात उभी ! म्हणून वाटलं किंचित् नवल ! योगायोगाचं !"

यावर ती आपल्या स्वरात लाडिक रुसवा आणून म्हणाली, ''हो ! योगायोगच म्हणायचा !! नाहीतर आम्ही आपलं मोठ्या अपेक्षेनं तुमची भेट घ्यायला यायचं, आमच्या नाटकाचं आमंत्रण देण्याला आणि आपण असायचे आपल्या नाटकाच्या दौऱ्यावर !''

मी मोठमोठ्यानं हसलो आणि नंतर नाटकी स्वरात म्हणालो, ''अच्छा ! म्हणजे आज आम्हाला नाटकाचे सन्माननीय पाहुणे म्हणून आमंत्रित करण्याला आपण स्वत: जातीनं येणं केलं म्हणायचं ! आपण केलेल्या या बहुमानाबद्दल मी आपले आभार मानतो.''

''आणि दारातून आपली बोळवण करतो, कोरडी ! असंच ना ?.... चांगली आहे आपली दारी आलेल्यांना वागवायची नागपुरी रीत !'' असं वेडावून म्हणत, हसतहसत कुंती एकदम आत आली अन् सौ.ला वहिनीच्या नात्यानं हाक मारीत थेट स्वयंपाकघरातच शिरली.

रात्री मी थिएटरवर गेलो तेव्हा तेथील आवार रंगीबेरंगी वस्त्राप्रावरणांनी नुसतं फुलून गेलं होतं. 'हाऊसफुल' चा बोर्ड दिमाखानं झळकत होता. मध्यमवर्ग, उच्चमध्यमवर्ग आणि धनिकवर्ग ह्यांचं एक छोटसं संमिश्र, रंगीबेरंगी आणि सुगंधित संमेलनच जणू काय तिथं भरलं होतं. आवारातच, खुल्या हवेत मांडलेल्या टी स्टँडवर तसेच इतरत्रही प्रेक्षकांचे निरनिराळे गट आपसात चर्चा करीत उभे होते. जरा कानोसा घेताच मला कळून आलं की जिथं तिथं कुंतीच्या सौंदर्याची, अभिनयाचीच चर्चा चालू होती. तिच्या मुख्य भूमिकेची तारीफ होत होती... नाटकाविषयी त्यामानानं एकंदरीत कमीच बोललं जात होतं.

मी असाच आवारात ओळखीच्या लोकांशी बोलत, आमच्या मंडळाच्या सभासदांशी गप्पा मारत फिरत होतो. एवढ्यात नाटकाची पाहिली बेल झाली.

कुंतीला शुभेच्छा देण्यासाठी बॅकस्टेजवर जावं की न जावं अशा विचारात मी असतानाच खुद्द नाटकाचेच दिग्दर्शक सस्मित चेहरा करून माझ्याकडे लगबगीनं आले आणि त्यांनी मला हात जोडून नमस्कार केला. मी त्यांच्या निमंत्रणाचा स्वीकार केला ह्याबद्दल त्यांनी माझे आभार मानले अन् मला आत घेऊन जाऊन त्यांनी माझी नाटकातील सर्व कलाकारांशी ओळख करून दिली. माझ्याबद्दल ते त्या कलाकारांशी मोठ्या गौरवानं बोलले. आम्ही सर्वांनी चहापान केलं त्यावेळी मी सर्वांना शुभेच्छा व्यक्त केल्या. एवढ्यात दुसरी घंटा झाली.

मी आता आपल्या खुर्चीवर बसण्यासाठी बाहेर निघणार इतक्यात कुंतीनं मला जरा एकीकडे गाठलं नि कुजबुजल्या स्वरात विचारलं की, ''वहिनी

आल्यात का ?"

मी नकारार्थी मान हालवली तेव्हा तिचा मेकअप केल्यामुळे अधिकच सुंदर दिसणारा चेहरा थोडा फुलून आला असा मला भास झाला !

झटकन तिनं माझ्या पावलांवर डोकं ठेवलं आणि ती आत गेली. मी प्रेक्षागृहातील आपल्या स्थानावर येऊन बसलो – कुंतीच्या या वर्तनाचा विचार करीत....

पण लगेचच थिएटरमध्ये अंधार झाला. पडदा वर गेला. शास्त्रज्ञाच्या खाजगी प्रयोगशाळेचा सेट दिसू लागला, नाटक सुरू झालं आणि मी ते पाहण्यात रमून गेलो....

टाळ्यांच्या गजरात नाटकाच्या तिसऱ्या अंकाचा पडदा पडला आणि मी भानावर आलो. नाटकाविषयी जे बोललं जात होतं ते यथार्थ होतं असं मला वाटलं. शास्त्रज्ञाच्या रुक्ष स्वभावाशी बांधल्या गेलेल्या त्याच्या रसिक पत्नीचं जिवंत चित्र कुंतीनं अत्यंत उत्कटपणे साकार केलं होतं. तिची होणारी कुचंबना, मनाचा कोंडमारा, निष्प्रेम, रखरखीत संसारात वठलेल्या आशा–आकांक्षा, मातृत्वाचा तिनं घेतलेला ध्यास, धडपड, निराशा इत्यादी भावभावनांचा उद्रेक कुंतीच्या अभिनयाद्वारे प्रेक्षकांच्या मनावर आघात करीत होता. सारी सहानुभूती ओढून घेत होता.... नाटकाच्या यशाचं बहुतांश श्रेय तिच्या अभिनयालाच होतं हे अगदी खरं होतं !

कुंतीचं मनापासून अभिनंदन करायला मी आत गेलो.

ग्रीनरूममध्ये कुंती मेकअप पुसत होती. मी तिचं अभिनंदन केलं तेव्हा ती कोरडं हसली. केलेल्या भूमिकेचा परिणाम अजून तिच्या मनावरून पूर्णपणे उतरला नव्हता. तिच्या डोळ्यात अजून ती अल्लड, नाचरी छटा पसरली नव्हती. ते उदास, भकास दिसत होते.

नंतर थोडा वेळ मी नाटकाच्या दिग्दर्शकाशी जुजबी गोष्टी केल्या. त्याचं औपचारिक अभिनंदन केलं आणि बाहेर जाण्यास निघालो तेव्हा घाईघाईनं कुंतीनं मला दारात गाठलं. मला आपल्या हॉटेलचा पत्ता आणि रूमनंबर दिला आणि उद्या दुपारी येण्यास विनवलं. खूप बोलायचं आहे, मनमुराद गप्पा मारायच्या आहेत, जरा नेहमीच्या रूटीनमधून बाहेर पडायचं आहे, एंजॉय करायचं आहे असं म्हणाली... रविवार असल्यामुळे बराच वेळ मोकळा आहे म्हणून !

मी तिला नकार देऊ शकलो नाही. तसं काही कारण नव्हतं म्हणून !.... तिच्या स्वरातील, मुद्रेवरील आर्तता मला जाणवली म्हणून !!.... कदाचित

तसा मला भास झाला असेल म्हणून !!!

पण मी होकार देताच तिला खूप आनंद झाला हे मला दिसून आलं.

मी घरी आलो त्यावेळी मी एका वेगळ्याच दुनियेत विहार करीत होतो. कुंतीच्या भूमिकेचा माझ्या मनावर पगडा बसला होता. तिच्या लावण्यानं मला भुरळ पाडली होती, मुंबईतील त्या नशिल्या आठवणींनी मी उत्तेजित झालो होतो, रात्री झोपेतही मला स्वप्न पडली होती; त्या आठवणींची ! धुंदफुंद !! मधूर !!!

सकाळी जाग आल्यावरही माझ्या मनावरचा अंमल कमी झाला नव्हता. तशा अवस्थेतच मी प्रातर्विधी आटोपले अन् लखनवी झब्बा आणि पायजामा असा पोशाख करून कुंतीकडे निघालो.... त्या तंद्रीतच मी तिच्या खोलीतील बेल वाजवली.

कुंतीनं डोळे चोळतच दार उघडलं आणि मला पाहून ती गोंधळली. 'अय्या ! तुम्ही !!' असा उद्‌गार काढून तिनं माझा हात धरून मला आत ओढलं अन् पटकन दार बंद केलं.

कुंती अजूनपर्यंत झोपलीच होती. रात्री घातलेला निळसर, पारदर्शक नाईटगाऊन अंगावर तसाच होता. वरचं बटन झोपेतच निघालेलं होतं, अन् आतील काचोळीविरहीत टंच उरोजाचं अर्धवट दर्शन नैसर्गिक स्थितीत होत होतं. अंगावर केवळ पारदर्शक गाऊन असल्यामुळे त्यातून कुंतीचा प्रमाणबद्ध गौर देह निळसर झाक लेवून बाहेर पडत होता. गालावर अस्ताव्यस्त पसरलेल्या केसांच्या बटा, लालवट डोळे अन् चेहऱ्यावर अजून रेंगाळलेली सुस्ती... किंचित् मदिराप्राशन करून उभी असलेल्या मदालसेसारखी कुंती माझ्यासमोर उभी होती !

मी अवाक् होऊन तिच्याकडे पाहातच राहिलो.... माझं मस्तक तापू लागलं... गरगरू लागलं.... अर्धवट उघड्या गाऊनमधून दिसणारी ती मादक खळी माझी नजर खेचून घेऊ लागली. मी स्थळकाळाचं भान विसरलो. स्वतःला गमावून बसलो.

माझं तसं रोखून पाहाणं कुंतीच्या लक्षात आलं असावं. कारण तिने खुर्चीकडे बोट दाखवून लाडिकपणे बसा म्हटलं आणि स्वतःच कॉटवर बसली. "कालच्या जागरणानं अंग कसं आंबून गेलं बाई !" असं म्हणताना दोन्ही हात वर मागे ताणून तिनं आळस दिला. त्यासरशी ताण पडल्यामुळे गाऊनचं वरील, आधीचंच सैल बटन तटकन सुटलं नि तिचं हिमगौरी भरदार वक्षस्थळ जवळजवळ

पूर्ण उघडं पडलं. शरीराची कमान इतकी आव्हानात्मक झाली की मी माझ्या ताब्यात राहिलो नाही. माझ्या शरीरात सैतानानं प्रवेश केला. मी ताडकन उठलो आणि तिच्या मागं झुकलेल्या शरीराला आपल्या मिठीत आवळून घेतलं. तिला छातीशी आवळत तिच्या चेहऱ्याची मी चुम्बनं घेऊ लागलो. सर्वांगावरून थरथरता हात फिरवू लागलो.... माझे डोळे मिटले !

क्षण दोन क्षण मी या दुनियेत नव्हतो !

अन् ज्या क्षणी मी भानावर आलो त्या क्षणी आत्यंतिक लज्जेने माझं मन झाकोळून गेलं.....

एका विवाहित स्त्रीच्या बाबतीत मी हे काय करून बसलो होतो.... वासनेच्या लोंढ्यात मी असा कसा वाहात गेलो ?.... कुंतीच्या लेखी आता आपली काय किंमत उरली असेल ?... तिच्या क्रोधाला आपण आता कोणतं तोंड घेऊन समोरं जाणार आहोत ?... काय स्पष्टीकरण करणार आहोत ?.... ती आपल्याला क्षमा करील का ?....

एका क्षणात माझ्या मनात असे असंख्य प्रश्न उभे राहिले. जमीन फाटून आपल्याला आत घेईल तर बरं असं वाटून माझी मिठी सैल झाली....

अन् त्याचवेळी कुंतीनं आपले दोन्ही हात माझ्या गळ्याभोवती टाकून मला घट्ट आवळलं नि माझं चुंबन घेतलं. 'नितीन' असा घोगरट उद्‌गार काढून माझ्या छातीवर आपलं मस्तक घुसळलं. अतीव सुखानं आपले डोळे मिटून घेतले.

तिच्या या अनपेक्षित वागण्यानं क्षणमात्रच मी गोंधळलो. पण दुसऱ्याच क्षणी माझ्या मनात या प्रकाराचा किळसवाणा अर्थ उघडा झाला. मनातलं कुंतीचं स्थान ढळलं. ती एक वासनेच्या कर्दमात लोळणारी प्रतिष्ठित वेश्या आहे ह्यापलीकडे तिची मला किंमत उरली नव्हती. मघापासूनचं तिचं वर्तन म्हणजे एक सापळा होता यात मला मुळीच संशय उरला नाही. मी तिनं बोलावल्याप्रमाणे दुपारी आलो असतो तरी तिनं असाच कोणता तरी डाव टाकला असता इतकंच...

पण तिच्या डावाला मी बळी पडलो, मला माझा विसर पडला. याची शरम मला वाटू लागली. कुंतीविषयीची घृणा मनात दाटून आली. तिरस्कारानं मी तिची मिठी ताडकन तोडून तिला दूर ढकललं. तशी ती अस्ताव्यस्त स्थितीत कॉटवर जाऊन पडली. भानावर येऊन तिनं माझ्याकडे पाहिलं. माझ्या चेहऱ्यावरचे भाव पाहून तिनं तशा स्थितीतच ओंजळीत तोंड लपविलं, ती स्फुंदू लागली. तिचं सर्वांग गदगदू लागलं.

मी आता पूर्ण शुद्धीवर आलो होतो. तिच्या त्या नाटकी रडण्याचा माझ्यावर परिणाम होणं शक्य नव्हतं. मी शांतपणे खुर्चीवर जाऊन बसलो आणि करड्या सुरात म्हणालो.

"बस्स कर, कुंती ! बस्स कर ! नाटक आवर अन् माझ्या प्रश्नाचं खरं उत्तर दे !"

मोठमोठे सुस्कारे टाकून कुंतीनं आपला शोक आवरल्यासारखं केलं. पलंगावरच ती सावरून बसली. एकवार अश्रुभरल्या नजरेनं माझ्याकडे पाहिलं आणि नंतर खाली मान घालून ती डोळे कोरडे करू लागली. मधून मधून उसासू लागली. तिकडे लक्ष न देता मी परत म्हणालो, "कुंती ! खरं सांग ! माझ्याशी असा खेळ खेळण्याचा तुझा मतलब ?"

"खेळ ?" कुंतीनं झटकन वर पाहिलं. एक तीव्र वेदना तिच्या चेहऱ्यावर झर्रकन झळकून गेली. दुसऱ्याच क्षणी तिनं परत मान खाली घातली आणि सुस्कारा सोडला. ती गाऊनची बटनं लावू लागली. ती नीट करू लागली.

मी आता चिडलो, म्हणालो,--"होय ! खेळच ! का खेळलीस माझ्याशी ? दुसरं कुणी नाही मिळालं ?"

"मी... माझं प्रेम जडलयं तुमच्यावर !" अस्फुट स्वरात कुंती खालच्या मानेनं म्हणाली. तिच्या गालांवर किंचित लज्जेची लाली चढल्याचा मला भास झाला. कुंती दर्जेदार नटी होती यात संशय नव्हता. हे उत्तरही तिनं बहुधा योजून ठेवलं असावं असं मला निश्चित वाटलं. मी उपहासानं विचारलं--

"अस्सं ! आपण विवाहित आहोत याचा विसर पडलेला दिसतोय तुला ?"

"पैशाकरता जमविलेल्या लग्नाला तुम्ही खरा विवाह समजता?" कुंतीनं मला मध्येच तोडून जरा उंच सूरात विचारलं, माझ्या नजरेला नजर भिडवून !

ही गोष्ट मला नवीनच होती. पण तिनं काही कुंतीच्या वर्तनाचं समर्थन होत नव्हतं. मी कुचेष्टेनं म्हटलं -

"वा: ! मोठं चांगलं समर्थन शोधून काढलंस !!... समाजात असे ठरवून झालेले विवाहच अधिक असतात. म्हणून काही...."

"मी कुठं समर्थन करते आहे, नितीनबाबू !" कुंतीनं मला मध्येच तोडलं. तिच्या सूरात आता एक वेगळीच धार अन् नजरेत एक विलक्षण चमक

आली होती. ती बोलू लागली -

"माझं म्हणणं एवढच की, विवाहानंतरही एखाद्या जोडप्यात परस्पर प्रेम, अपेक्षित असं उत्पन्न होऊ शकलं नाही तर..."

"दोषारोपणच करायचं तर तो तुझ्याकडेच येईल, समजलं ?" मी म्हणालो, "मिस्टर कोठे तुला किती जीवापाड जपतात, तुझं किती कौतुक करतात हे मी प्रत्यक्ष पाहिलं आहे."

"विकत घेतलेली सुंदर वस्तु कुणीही जिवापाडच जपतो, नितीनबाबू !" कुंती उपरोधानं म्हणाली, "बाकी कौतुक वगैरे सारं वरवरचं ! देखावा !!.... आत्यंतिक, दृढ प्रेमापोटी-पति-पत्नीत उत्पन्न होणारा दृढ विश्वास, निष्ठा, आमच्यात कधी उत्पन्न झाली नाही...."

"छे ! नाही पटत ! तसं असतं तर त्यांनी तुला इथं पाठवलंच नसतं एकटं ! मंडळाच्या लोकांबरोबर !!" मी अविश्वासदर्शक मान हलवली.

कुंती किंचित् उदासवाणं हसली. म्हणाली, "रूपवान बायकोच्या हट्टापुढे मोठमोठ्या लोकांचं चाललं नाही, नितीनबाबू !"

"पण हा हट्ट ?"

"तुम्हाला भेटायला म्हणून !"

"पण का ?"

"का परत तेच ते बोलायला लावताहात नितीनबाबू !" कुंती उचंबळून बोलू लागली. भावनावेग न आवरता आल्यानं भरभरं- माझं प्रेम बसलंय तुमच्यावर ! मुंबईच्या तुमच्या ट्रीपमध्ये, तुमच्या सहवासात फुललेली ही प्रीतीची कळी, आयुष्यात प्रथमच अनुभवाला आलेली ही भावना, तुम्ही नागपूरला परतल्यावर माझ्या लक्षात आली. मला कळून चुकलं की ज्या प्रिय व्यक्तीला सर्वस्व अर्पण करावं, जिची सावली होऊन राहावं, जिच्या प्रेमात डुंबत राहावं, जिच्यावरून प्राण ओवाळून टाकावे अशी व्यक्ती, असा पुरुषोत्तम माझ्या आयुष्यात आला आहे. उशीरा का होईना पण अवतरला आहे... अन् तेव्हापासून मी तुमची मनोमन पूजा बांधते आहे, जवळजवळ वर्षभर तळमळते आहे, भेटीसाठी!"

कुंतीच्या डोळ्यातून आता झरझर अश्रू वाहू लागले. बोलताना घशात आवंढे दाटून येऊ लागले. ती काही वेळ थांबली. स्वत:वर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करू लागली.

तिचा हा अविर्भाव पाहून माझ्या ठिकाणी दुसरा कुणीही असता तर

नक्कीच विरघळला असता, पण मी अशा तऱ्हेचा हुकमी अभिनय बऱ्याच वेळा पाहिलेला होता. स्वतः केला होता. इतरांकडून करवून घेतला होता. त्याचा माझ्यावर काही परिणाम होणं शक्य नव्हतं. मी पूर्वीच्याच पण जरा कडक सुरात म्हणालो -

"पण आजपर्यंत तर तू कधीच मला ह्याची जाणीव दिली नाही- प्रत्यक्ष किंवा पत्रव्यवहारातून ?"

"मला भिती वाटत होती ! ह्याचीच !! तुम्ही माझा अव्हेर कराल ह्याचीच !!! तुमचं आपल्या कलेच्या खालोखाल आपल्या पत्नीवर आपल्या छोट्याशा संसारावर किती प्रेम आहे हे मला माहीत होतं म्हणून...."

"म्हणून तू असा डाव टाकलास ?" मी चिडून विचारलं, "मला आपल्या पकडीत आवळण्यासाठी, कायमचं आपल्या जाळ्यात अडकवून ठेवण्यासाठी, मला माझ्या विश्वातून उठवण्यासाठी, आपल्या सौंदर्याचं, देहाचं उघडं प्रदर्शन मांडलंस ?"

माझं बोलणं जिव्हारी लागल्यासारखं कुंतीनं चित्कार केला आणि तिनं माझ्या पायांना मिठी मारली. घट्ट !

मी पाय सोडविण्याचा प्रयत्न केला तेव्हा वर माझ्याकडे पाहत व्याकुळस्वरात ती बोलू लागली.

"नका ! नका असा जिव्हारी घाव घालू ! माझ्या मनात तसं काही नव्हतं हो ! खरचं काही नव्हतं ! जे घडलं ते अगदी अकल्पित ! अगदी अनपेक्षित ! पण.... पण खोटं कशाला सांगू ! घडलं ते वांछितच होते मी. त्याची मागणी करणारच होते. जिवाचा घडा करून ! यासाठीच मी तुम्हाला बोलावलं होतं. आज दुपारी.... सोक्षमोक्ष लावायचा होता मला ..... नेहमीसाठी !.... एकदाच का होईना, पण तुमच्या प्रेमात शीतल वर्षावात मला माझ्या देहाची, मनाची आग शांत करायची होती.... तगमग नाहीशी करायची होती. आजवर रिकामी राहिलेली माझी कुस अंकुरित करायची होती. तुमच्या प्रेमाचा अंश तीत वाढवून धन्य व्हायचं होतं मला. त्या तुमच्या प्रतिकृतिकडे पाहून पुढील आयुष्य सुखानं घालविणार होते मी, बस्स ! एवढीच माझी इच्छा होती, अपेक्षा होती. त्यासाठीच तळमळत होते....रात्रंदिवस !....अन् इतक्या अनपेक्षित रीतीनं, इतकं सहज; ते सुखाचं ताट समोर वाढून आलं की आनंदातिशयानं मला भान राहिलं नाही. माझ्याकडून तो अतिप्रसंग घडला, भिती नाहीशी

झाल्यानं ! पण.... पण तुम्ही विपरीत अर्थ केला माझ्या वागण्याचा आणि...''

अनंत यातना झाल्यासारखी कुंती हुंदके देऊन पुन्हा रडू लागली.

तिच्या या बेगडी प्रदर्शनाचा मला आता अगदी वीट आला. असं नाटक तिनं यापूर्वी आणखी कितीतरीजणांबरोबर केलं असेल यात मला संशय उरला नाही. माझं तिच्या बद्दलचं आधीचंच मत कायम झालं होतं.... वासनेच्या खातेऱ्यात लोळणारी प्रतिष्ठित वेश्या !

मी ताडकन् उठलो अन् एक शब्द न उच्चारता तिची पायाची मिठी सोडून दरवाजाकडे जाण्यास निघालो. घृणेनं माझं मन ओतप्रोत भरून गेलं होतं.

बाहेर पडण्यापूर्वी मी एकवार मागं वळून पाहिलं.

कुंती पाषाणवत् तशीच बसून होती ! माझ्याकडे पाहात !! डोळ्यात सारे प्राण गोळा करून !!!

मी निग्रहानं मान वळवून बाहेर पडलो.

पण त्या नजरेनं मी थोडा अस्वस्थ झालोच ! माझ्या मनात अनेक प्रश्न उभे राहिले. मी बरोबर वागलो का ? मी कुंतीवर अन्याय तर करत नव्हतो? माझी समजूत बरोबर आहे ? की मी भ्याड आहे ? माणुसकीच्या दृष्टीनं माझं काही चुकलं का ? समजा, तिचं वागणं खोटं नसलं तरी मी काय करू शकणार होतो ? मी तिची इच्छा पुरी करू शकलो असतो ? स्वतःच्या पत्नीशी प्रतारणा करून ? स्वतःच्या निष्ठांवर तिलांजली देऊन ?

माझं कुंतीवर तसं प्रेम वगैरे काही नव्हतं. केवळ एका मोहाच्या क्षणी माझं पाऊल थोड घसरलं होतं. पण लगेच मी तोल सावरला होता. आणि तीच धारेला लागली होती.

पण म्हणून मी माझ्या पत्नीशी, कलेशी बेईमानी करू शकत नव्हतो. मी नाट्यव्यवसायात पडलो होतो. अन् ह्या व्यवसायात असे मोहाचे भोवरे अनेक येत असतात, जागोजाग लपलेले असतात हे मला माहीत होतं. ह्या भोवऱ्यांना चुकवून जो पुढे गेला, जो ह्यातून वाचला तोच ह्या व्ययसायात तरला, यशस्वी झाला, नाव कमावून राहिला, हे मला माहीत होतं. आणि हेच माझं स्वप्न होतं. ध्येय होतं. अशा तऱ्हेच्या भोवऱ्यात सापडून मोठमोठ्या कलावंतांची माती झाली होती. अन् मी तर आता कुठं या दिशेने पहिल पाऊल उचललं होतं. मला असं वागून चालणार नव्हतं ! भागणार नव्हतं !!.... शिवाय कुंती माझ्याशिवाय अडून थोडीच बसणार होती ?.....

मनात एक अपूर्व समाधान घेऊन मी घरी परतलो....